MHKO070000541997

**नियमित दिवाणी दावा क्र.१३०/१९९७ मधील नि.क्र.२४१ वर आदेश**
**(भास्कर कांबळे –विरुध्द– मारुती सिध्दु कांबळे आणि इतर )**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ आणि मुदत कायदा कलम ५ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करुन अबेटमेंटचा आदेश रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील वादी भास्कर आत्माराम कांबळे हे दि.१९/०५/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांच्या मृत्युसमयी कोविड–१९ च्या प्रकोपामुळे न्यायालयीन कामकाज पूर्णपणे बंद होते. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वकष आदेशाप्रामणे मुदत गोठवण्यात आली होती. मा.न्यायालयाचे कामकाज दि.०७/०९/२०२१ ला चालू झाले व जी मुदत गोठवली होती ती दि.०२/१०/२०२१ पासून पूर्ववत झाली. त्यामुळे तांत्रीकदृष्टया जरी वारस अभिलेखावर आणण्यासाठी चार महिन्यांचा विलंब झाला असला तरी उपरोक्त उपस्थितीनुसार प्रत्यक्षात कोणताही विलंब होत नाही. त्याचप्रमाणे मयत भास्कर यांची मुलगी सुनंदा भारत कांबळे या दि.२२/०९/२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत त्यामुळे त्यांच्याबाबतीतही कोणताही विलंब झालेला नाही. तसेच भास्कर कांबळे यांच्या मृत्युनंतर मुलगी सुनंदा ही आई व भावापाशीच राहण्यासाठी होती. तिच्या आतडयांना सुज आल्याने ती गेली ५ ते ६ महिने उपचार घेत होती व त्यातच तिचा मृत्यु झाला. तिच्यावर आई सुशिला व भाउ विनोद हेच उपचार करत होते. त्यामुळे मुदतीत वकीलांना भेटून पूर्तता करता आली नाही. त्यामुळे

विलंब झालेला आहे तो उपरोक्त कारणांमुळे झाला असून तांत्रीकदृष्टया अबेटमेंट आदेश रद्द होवून तांत्रीक विलंब माफ करुन अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

३.　　प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास आक्षेप नोंदवला. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४.　　उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील वादपत्र व कादगपत्रे पाहिली. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाकरीता व वाटणीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे आणि त्यांची मुलगी सुनंदा भारत कांबळे यांच्या मृत्यू दाखल्यांच्या साक्षांकित प्रती निशाणी क्र.२४० सोबत दाखल केलेल्या आहेत. त्याचे अवलोकन करता वादी भास्कर हे दि.१९/०५/२०२१ रोजी व त्यांची मुलगी सुनंदा ही दि.२२/०९/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी क्र.१ हे दिनांक १९/०५/२०२१ रोजी मयत झाले तारखेपासून ९० दिवसांमध्ये वादींनी वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतू त्यांनी मृत्युतारखेपासून ९० दिवसात वारस अभिलेखावर आणले नसल्यामुळे दि.१६/०८/२०२१ रोजी वादी क्र.१ विरुध्द प्रस्तुतचा दावा अबेट झाला व प्रस्तुतचा अर्ज ४ महिन्याच्या विलंबाने म्हणजे दि.१४/१२/२०२१ रोजी वादीने दाखल केला आहे. वादी यांना वारस अभिलेखावर घेण्यासाठी चार महिन्यांचा विलंब झालेला दिसून येत आहे.

५.　　परंतू मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सुओ–मोटो रिट पिटीशन (सिव्हील) क्र.०३/२०२०, दि.२३/०९/२०२१ रोजीच्या आदेशानुसार दि.०२/१०/२०२१ रोजीपर्यंत मुदत गोठवण्यात आली होती. त्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीत दाखल करण्यात आला आहे. सदरचा विलंब हा

जाणूनबुजून झालेला नाही. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादींचा महत्वपूर्ण हक्क नाकारल्यासारखे होईल. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले असतात. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते–

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करुन अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

स्वाक्षरीत/–

**( रोहिनी अ. जाधव )**

दि.१०/०१/२०२१.

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर